**ग्रामपंचायत कर्मचा-यांचे वेतन ऑनलाईन पद्धतीने थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करणेबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः व्हीपीएम-२०१७/प्र.क्र.२७ /पंरा-३**
बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट
मंत्रालय, मुंबई -४०० ००१
तारीख: ६ जानेवारी, २०१८

वाचा -

१) **शासन निर्णय क्रमांकः व्हिपीएम-२६९९/प्र. क्र.२०६(१)/२१,दि.२१.१.२०००**
२) **शासन निर्णय क्रमांकः व्हिपीएम-२०१२/प्र. क्र.२३५/पंरा-३,दि.४.३.२०१४**
३) **उद्योग, उर्जा व कामगार विभागाची अधिसूचना क्रमांक किवेअ.२०१३/५२/ प्र.क्र.२७/कामगार-७, दिनांक ७.८.२०१३**

**प्रस्तावना -**

ग्रामपंचायत कर्मचा-यांना अनुज्ञेय असलेले किमान वेतन त्यांना वेळेवर मिळत नसल्याने, त्यांचे वेतन बँक खात्यामध्ये जमा करण्याबाबतची मागणी मा.मंत्री (ग्रामविकास) व सचिव (ग्रामविकास) यांचेकडे आयोजित करण्यात आलेल्या बैठकांमध्ये ग्रामपंचायत कर्मचा-यांकडून वारंवार करण्यात येत होती. त्यास अनुसरुन सर्व ग्रामपंचायत कर्मचा-यांचे बँक खाते आधार कार्डशी संलग्न करुन, त्यांचे वेतन राहणीमान भत्त्यासह परस्पर त्यांच्या बँक खात्यामध्ये ऑनलाईन पध्दतीने जमा करण्याची बाब शासन स्तरावर विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

ग्रामपंचायत कर्मचा-यांचे वेतन ऑनलाईन पद्धतीने थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची योजना राज्य शासनाचा ग्रामविकास विभाग व एच.डी.एफ.सी. बँक यांच्या संयुक्त माध्यमातून राबविण्यात येणार आहे. सदर योजना राबविण्यासाठी ग्रामविकास विभाग व एच.डी.एफ.सी.बँक यांच्या मध्ये करारनामा करण्यात येत आहे.

२. या योजनेंतर्गत एच.डी.एफ.सी.बँक यांचे मार्फत ग्रामपंचायत कर्मचारी ऑनलाईन वेतन प्रणाली विकसित करण्यात येईल. त्याअन्वये ग्रामपंचायत कर्मचा-यांचे वेतन ऑनलाईन पद्धतीने थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल. या प्रणालीबाबतची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत:-

१) ग्रामपंचायत कर्मचारी ऑनलाईन वेतन प्रणाली ही ऑनलाईन रिअल टाईम आधारित (Online Real-Time Basis) असणार आहे.

२) ग्रामसेवकामार्फत ग्रामपंचायत कर्मचा-यांची सर्वंकष माहिती ग्रामपंचायत कर्मचारी ऑनलाईन वेतन प्रणालीवर भरण्यात येईल व सदर माहिती संबंधित गट विकास अधिकारी यांचेकडून प्रमाणित करण्यात येईल.

३) ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या वेतन देयकातील शासनाचा देय हिस्सा त्या ग्रामपंचायतींच्या लोकसंख्येच्या व उत्पन्नाच्या आधारावर संगणकाद्वारे अंतिम करण्यात आला आहे.

४) ग्रामपंचायत कर्मचारी ऑनलाईन वेतन प्रणालीमध्ये ग्रामपंचायत / तालुका / जिल्हा निहाय ताळमेळाचे (Auto - Reconciliation) अहवाल संगणकाद्वारे एच.डी.एफ.सी.बँक मार्फत राज्यस्तरीय प्रशासक (State Level Admin) व राज्य प्रकल्प संचालक, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान/राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान, पुणे यांना व जिल्हानिहाय ताळमेळाचा अहवाल संबंधीत जिल्ह्याचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांना उपलब्ध होतील.

५) राज्यस्तरीय प्रशासक म्हणून काम पाहण्याची जबाबदारी उपसचिव (कार्यासन पं.रा-३), ग्राम विकास विभाग यांची राहील.

६) ग्रामपंचायत कर्मचारी ऑनलाईन वेतन प्रणालीची उपयोगकर्ता पुस्तिका (User Manual), FAQ (https://mh.gov२egov.com/GeneralPages/FAQ.aspx ), Operating Videos, PPT, Help इत्यादी प्रशिक्षण साहित्य (https: // mh .gov २egov .com /General Pages/ HomeNew.aspx) या लिंक वर लॉगीन करुन ट्रेनिंग मॅन्युअल या पर्यायामध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे.

७) या सर्व ऑनलाईन वेतन पध्दती / कार्यप्रणालीचे संनियंत्रण करण्याची जबाबदारी जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांची व राज्यस्तरावर राज्य प्रकल्प संचालक, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान / राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, पुणे यांचेकडे स्थापन करण्यात आलेल्या कक्षाची राहील .

३. या योजनेंतर्गत राज्य शासनाचा ग्राम विकास विभाग व एच.डी.एफ.सी.बँक यांच्या जबाबदा-या व कर्तव्ये पुढीलप्रमाणे राहतील:-

**<u>ग्राम विकास विभागाची कर्तव्ये व जबाबदारी :-</u>**

१) ग्रामपंचायत कर्मचा-याचे नाव, जन्मतारीख, नियत वयोमानानुसार सेवा निवृत्तीचा दिनांक, कार्यालयातील उपस्थिती, आधार क्रमांक, बचत खाते क्रमांक, भविष्य निर्वाह निधीचे संयुक्त खाते क्रमांक आणि वेतन अनुदान याबाबतची माहिती संगणक प्रणालीमध्ये भरण्यासाठी /अद्ययावत करण्यासाठी संबंधित ग्रामसेवक /ग्रामविकास अधिकारी जबाबदार असेल.

ग्रामसेवक /ग्रामविकास अधिकारी प्रत्येक महिन्याच्या २५ तारखेपर्यंत सदर माहिती ग्रामपंचायत कर्मचारी ऑनलाईन वेतन प्रणालीवर भरतील.

२) संदर्भाधीन क्रमांक २ च्या शासन निर्णयान्वये वेतन अनुदानाच्या १००% व ७५% वाढीव हिश्यास पात्र होण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतीने नियमाप्रमाणे दर ४ वर्षानी नियमितपणे फेरआकारणी करणे व मागील वर्षात सर्व करांच्या एकूण मागणीच्या ९०% वसूली करणे बंधनकारक करण्यात आले आहे. (उदा. सन २०१५-१६ या वर्षी केलेल्या फेरआकारणीस अनुसरुन सन २०१६-१७, सन २०१७-१८, सन २०१८-१९ व सन २०१९-२० करीता १००% व ७५% वाढीव हिश्यास पात्र होण्यासाठी ग्रामपंचायतीने त्या त्या वर्षी ९०% वसूली करणे बंधनकारक राहील). त्या अनुषंगाने माहिती भरल्याची तसेच वर अ.क्र.१ येथील माहितीची संबंधित गट विकास अधिकारी यांनी प्रत्येक महिन्याच्या २९ तारखेपर्यत खात्री (Confirmation) करावी. यासाठी गट विकास अधिकारी यांना ग्रामपंचायत कर्मचारी ऑनलाईन वेतन प्रणालीमध्ये लॉग ईन उपलब्ध करून देण्यात आले आहे.

३) राज्य शासनाच्या वतीने राज्य प्रकल्प संचालक, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान/राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान, पुणे यांच्या नावाने एच.डी.एफ.सी. बँकेमध्ये एक खाते (Smart Account) उघडण्यात येईल.

४) ग्रामपंचायत कर्मचा-यांचे वेतन त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या ग्रामपंचायत कर्मचारी ऑनलाईन वेतन प्रणालीच्या कार्यक्षम व सहज वापरासाठी ग्रामविकास विभागामार्फत ग्रामपंचायत कर्मचा-यांचे वेतन अनुदान राज्य प्रकल्प संचालक, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान/राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान, पुणे यांच्या नावाने एच.डी.एफ.सी. बँकेमध्ये उघडण्यात आलेल्या खात्यावर जमा करण्यात येईल. राज्य प्रकल्प संचालक, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान/राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान, पुणे यांच्या नावाने एच.डी.एफ.सी. बँकेतील खात्यामध्ये जमा करण्यात आलेल्या अनुदानातून ग्रामपंचायत कर्मचा-यांचे प्रत्येक महिन्याचे वेतन थेट त्यांच्या बँक खात्यामध्ये एच.डी.एफ.सी. बँकेमार्फत ऑनलाईन पध्दतीने वर्ग करण्यात येईल.

५) वित्त विभागाकडून ग्राम विकास विभागास उपलब्ध करून देण्यात येणारे ग्रामपंचायत कर्मचा-यांचे वेतन अनुदान कोषागारातून आहरित करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी, रोख शाखा, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना या शासन निर्णयान्वये प्राधिकृत करण्यात येत आहे.

६) ग्रामपंचायत कर्मचा-यांचे किमान वेतन त्यांना दरमहा वेळेत मिळण्याकरीता राज्यस्तरीय प्रशासक यांचेमार्फत ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या किमान वेतन अनुदानाची रक्कम अग्रिम स्वरुपात राज्य प्रकल्प संचालक, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान/ राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान, पुणे यांच्या नावे एच.डी.एफ.सी. बँकेमध्ये असलेल्या खात्यामध्ये जमा करण्याबाबतचे शासन निर्णय निर्गमित करण्यात येतील.

७) राज्यस्तरीय प्रशासक यांचेमार्फत दरमहा निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयांच्या अनुषंगाने ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या किमान वेतन अनुदानाची रक्कम आहरण व संवितरण अधिकारी, रोख शाखा, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी कोषागारातून आहरित करुन धनादेशाद्वारे / RTEGS द्वारे राज्य प्रकल्प संचालक, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान/ राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान, पुणे यांच्या नावे एच.डी.एफ.सी. बँकेमध्ये असलेल्या खात्यामध्ये जमा करावी.

८) ग्रामसेवक / ग्रामविकास अधिका-याकडून त्यांच्या अधिपत्याखालील ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या उपस्थितीच्या नोंदीसह आवश्यक ती अद्यावत माहिती ग्रामपंचायत कर्मचारी ऑनलाईल वेतन प्रणालीमध्ये भरण्यात येईल. त्याची खातरजमा वरील मुद्दा क्र. २ नुसार संबंधीत गट विकास अधिकारी करतील.

९) गटविकास अधिका-यांनी उपरोक्त माहितीची खात्री केल्यानंतर प्रत्येक महिन्याच्या ३० तारखेपर्यंत संबंधित ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी वेतनाचे देयक तयार करतील. जिल्हा निहाय ग्रामपंचायत कर्मचा-यांचे एकत्रित वेतन व भविष्य निर्वाह निधी कपातीचा तक्ता संबंधीत जिल्ह्याचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) पुढील महिन्याच्या २ तारखेपर्यंत अंतीम करून राज्य प्रकल्प संचालक, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान/राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान यांचेकडे पाठवतील. सदरचा एकत्रित वेतन तक्ता राज्य प्रकल्प संचालक, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान/राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान, पुणे यांचे लॉगईन मध्ये प्राप्त झाल्यानंतर त्याच महिन्याच्या ५ तारखेपर्यंत त्याबाबतची मागणी राज्य प्रकल्प संचालक, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान/राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान, पुणे यांचेकडून एच.डी.एफ.सी बँकेकडे पाठविण्यात येईल.

१०) राज्य प्रकल्प संचालक, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान/राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान, पुणे यांची जबाबदारी त्यांच्या बँक खात्यावर जमा होणारी रक्कम व त्यामधून उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांचेकडून प्राप्त झालेल्या एकत्रित वेतन तक्त्यानुसार

वितरीत केलेली रक्कम यांचे दरमहा ताळमेळ (Reconciliation) घेण्यापर्यंत मर्यादीत राहील.

११) या सर्व कार्यपध्दतीची अंमलबजावणी यशस्वीरित्या करण्याच्या दृष्टीने राज्य प्रकल्प संचालक, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान/ राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान, पुणे यांचे कार्यालयामध्ये खालीलप्रमाणे कक्ष स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) सहाय्यक गट विकास अधिकारी - १ पद
२) सहाय्यक/कनिष्ठ लेखाधिकारी - १ पद
३) वरिष्ठ/कनिष्ठ सहाय्यक (लेखा) - २ पदे

१२) उपरोक्त नमूद एकूण ४ पदे जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरून उसनवारीने उपलब्ध करून घेण्यात येतील. त्यासाठी राज्य प्रकल्प संचालक राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान/ राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान, पुणे यांनी राज्यातील जिल्हा परिषदांकडून या पदांसाठी नामनिर्देशन घेवून त्यामधून उपरोक्त पदांवर जिल्हा परिषदेकडील अधिकारी/कर्मचा-यांची निवड करावयाची आहे.

१३) उपरोक्त पदांची आस्थापना संबंधीत जिल्हा परिषदेकडेच राहणार असून त्यांचे वेतन, भत्ते व इतर अनुषंगिक आर्थिक बाबी संबंधित जिल्हा परिषदेकडून अदा करण्यात येतील. सदर कर्मचा-यांच्या प्रशासकीय बाबी संबंधित जिल्हा परिषदेकडेच राहतील. या अधिकारी/कर्मचा-यांना कोणत्याही स्वरूपाचा प्रतिनियुक्ती भत्ता देय असणार नाही. राज्य प्रकल्प संचालक यांनी संबंधितांचा उपस्थिती अहवाल दरमहा संबंधीत जिल्हा परिषदेच्या आस्थापना विभागाकडे पाठवावयाचा असून त्यानुसार संबंधीत जिल्हा परिषद आस्थापनेने त्यांचे वेतन व भत्ते अदा करावयाचे आहेत.

१४) ग्रामपंचायत कर्मचा-याचे वेतन त्यांच्या खात्यावर जमा केल्यानंतर ग्रामसेवक / ग्राम विकास अधिकारी यांनी संबंधित ग्रामपंचायत कर्मचा-याची वेतन चिठ्ठी (salary slip) पुढील शासकीय कामकाजासाठी ग्रामपंचायतीच्या अभिलेखामध्ये ठेवावी.

१५) ग्रामपंचायत कर्मचारी वेतनाच्या अनुषंगाने आवश्यक ते अभिलेख पंचायत समिती व जिल्हा परिषदस्तरावरही लेखा परिक्षण व अन्य कामकाजास्तव जतन करावेत. याकरीता पुर्वीप्रमाणेच कार्यपध्दती राहील.

१६) ग्रामसेवक / ग्राम विकास अधिकारी ग्रामपंचायत कर्मचा-यांची भविष्य निर्वाह निधीची माहिती ग्रामपंचायत कर्मचारी वेतन प्रणालीमध्ये भरताना या प्रयोजनार्थ उघडण्यात

आलेल्या संबंधित कर्मचारी व ग्रामसेवक / ग्राम विकास अधिकारी यांचे नावे उघडण्यात आलेल्या संयुक्त बँक खात्याची माहिती देखील भरेल. ग्रामपंचायत कर्मचा-याची भविष्य निर्वाह निधीची संपूर्ण रक्कम (कर्मचारी हिस्सा व ग्रामपंचायत हिस्सा) संबंधित कर्मचा-याच्या खात्यावर जमा करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने ग्रामपंचायत कर्मचा-यास त्याच्या वेतन अनुदानाच्या शासनाच्या देय हिश्यातून ८.३३% रक्कम ग्रामपंचायत कर्मचारी ऑनलाईन वेतन प्रणालीद्वारे उक्त संयुक्त खात्यामध्ये वर्ग करण्यात येईल. ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या वेतन अनुदानापोटी ग्रामपंचायतीच्या हिश्याच्या (ग्रामपंचायतीने किमान वेतनापोटी देय उर्वरित २५% / ५०% रक्कम) रकमेच्या ८.३३% रक्कम अधिक ग्रामपंचायतीचा हिस्सा (कर्मचारी किमान वेतन अनुदानाच्या ८.३३% रक्कम) भविष्य निर्वाह निधीच्या सदर संयुक्त बँक खात्यामध्ये ग्रामपंचायतीमार्फत जमा करण्यात येईल. ग्रामपंचायत कर्मचारी ऑनलाईन वेतन प्रणालीद्वारे ज्या दिवशी कर्मचा-यांच्या वेतन अनुदानाची रक्कम एच.डी.एफ.सी बँकेमार्फत संबंधित कर्मचा-याच्या वेतनाच्या बँक खात्यावर जमा होईल त्या दिवसापासून ३ दिवसांच्या आत उक्त नमूद भविष्य निर्वाह निधीची रक्कम ग्रामपंचायतीमार्फत त्या प्रयोजनार्थ उघडण्यात आलेल्या संयुक्त बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल. याचा नियमित आढावा गट विकास अधिकारी आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) हे घेतील.

१७) ग्रामपंचायत कर्मचा-यांना देय असणारा राहणीमान भत्ता हा ज्या दिवशी कर्मचा-यांच्या वेतन अनुदानाची रक्कम एच.डी.एफ.सी बँकेमार्फत संबंधित कर्मचा-याच्या वेतनाच्या बँक खात्यावर जमा होईल त्या दिवसापासून ३ दिवसांच्या आत ग्रामपंचायतीने ग्रामपंचायत कर्मचा-याच्या वेतनाकरीता ग्रामपंचायत कर्मचारी ऑनलाईन वेतन प्रणालीमध्ये नोंदविण्यात आलेल्या बँक खात्यावर जमा करावयाचा आहे.

<u>**एच.डी.एफ.सी.बँकेची कर्तव्ये व जबाबदारी:-**</u>

१) ऑनलाईन पद्धतीने ग्रामपंचायत कर्मचा-यांचे वेतन अदा करण्यासाठी एच.डी.एफ.सी.बँकेमार्फत ग्रामपंचायत कर्मचारी ऑनलाईन वेतन प्रणाली तयार करण्यात येईल.

२) जिल्हा निहाय ग्रामपंचायत कर्मचा-यांचे एकत्रित वेतन मागणी व भविष्य निर्वाह निधी कपातीबाबतचा तक्ता राज्य प्रकल्प संचालक, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान/राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान, पुणे यांचेकडून एच.डी.एफ.सी बँकेकडे वरील

प्रणालीद्वारे प्राप्त झाल्यानंतर एच.डी.एफ.सी. बँकेकडून ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या वेतन अनुदानाची रक्कम ग्रामपंचायत कर्मचारी ऑनलाईन वेतन प्रणालीमध्ये नोंदविण्यात आलेल्या ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या वेतन अनुदान बँक खात्यामध्ये व भविष्य निर्वाह निधीची रक्कम संबंधित कर्मचारी व ग्रामसेवक / ग्राम विकास अधिकारी यांचे नावे उघडण्यात आलेल्या संयुक्त बँक खात्यामध्ये वितरीत करण्यात येईल. याबाबत जिल्ह्याचा एकत्रित अहवाल संबंधीत जिल्ह्याचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

३) एच.डी.एफ.सी.बँकेकडून ग्राम विकास विभागाला उपरोक्त सेवा नि:शुल्क पुरविण्यात येईल म्हणजेच सदर सेवेसाठी ग्रामविकास विभाग बँकेस कोणत्याही प्रकारचे शुल्क देय राहणार नाही.

४) सदर प्रकल्पाशी निगडीत विविध प्रकारचे अहवाल प्रणालीच्या डॅशबोर्डवर एच.डी.एफ.सी.बँकेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येतील.

५) ग्रामपंचायत कर्मचारी ऑनलाईन वेतन प्रणाली सुस्थितीत, सुरक्षित व अद्यावत ठेवण्यात येईल.

६) ग्रामपंचायत कर्मचा-यांचे वेतन अनुदान राज्य प्रकल्प संचालक, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान/ राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान, पुणे यांचे नावे एच.डी.एफ.सी. बँकेच्या खात्यात प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एच.डी.एफ.सी.बँकेमार्फत तीन दिवसांच्या आत (T + ३) ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

७) शासनाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयांच्या अनुषंगाने ग्रामपंचायत कर्मचारी ऑनलाईन वेतन प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल एच.डी.एफ.सी.बँके मार्फत विनामोबदला करण्यात येईल.

८) कोणत्याही परिस्थितीत ग्रामपंचायत कर्मचारी ऑनलाईन वेतन प्रणालीमध्ये कोणतेही अनावश्यक बदल होणार नाहीत याची संपूर्ण जबाबदारी एच.डी.एफ.सी.बँकेची राहील.

९) एच.डी.एफ.सी.बँकेमार्फत या प्रयोजनार्थ हेल्पडेस्क व कॉलसेंटर स्थापन करुन कार्यान्वित करण्यात येईल.

४. ग्रामपंचायत कर्मचा-यांना वेतन अनुदान वितरीत करण्यासाठीचा खर्च मागणी क्रमांक एल-०२, ०७ - मानधन व इतर भत्ते यासाठी अनुदाने-(०७) (०१)-ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य यांचे मानधन व इतर भत्ते आणि कर्मचाऱ्यांचे किमान वेतन (२०५३ १०४२)-३१- सहायक अनुदाने या लेखाशीर्षाखाली त्या आर्थिक वर्षात मंजूर झालेल्या तरतुदीतून करण्यात यावा.

५. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.**२४/१७/**को.प्र-**५,** दिनांक **२३** फेब्रुवारी**, २०१७** अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१०६११०३५५५८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aseem Gupta

Digitally signed by Aseem Gupta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42cb1d992ceadc1f5fea3c14e1cedf9b5ea392a9c81fdbde5629e68c9158678b, cn=Aseem Gupta
Date: 2018.01.08 12:12:52 +05'30'

**(असीम गुप्ता)**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा. मंत्री ग्रामविकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४. मा. राज्यमंत्री ग्रामविकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
५. मा. मुख्य सचिव, मंत्रालय मुंबई-३२
६. विभागीय आयुक्त (सर्व)
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८. श्री.बाळकृष्ण एस.आजगावकर, Dy. Vice President & Branch Manager, HDFC Bank, CST Branch, Mumbai.
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०.राज्य प्रकल्प संचालक, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान / राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान, A-९,विंग-२, १६१/A, शिवसागर अपार्टमेंट, मोदी बाग, कृषी महा-विद्यालय, म्हसोबा गेट जवळ, शिवाजीनगर, पुणे - ४११०१६
११.उपसचिव (आस्था), ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.उपसचिव (वित्त), ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१४.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद (सर्व)
१५.आहरण व संवितरण अधिकारी, रोख शाखा, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६.निवडनस्ती-कार्यासन पंरा-३.